खटला दाखल तारीख : २९/०५/२०१९
खटला फैलावर तारीख: २९/०५/२०१९
खटला निकाल तारीख : २०/०५/२०२६
कालावधी : व. म. दि.
०६ ११ २१
निशाणी क्रमांक : **५४/ब**

**भाग अ**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी आर्णी, जि. यवतमाळ यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : विशाल श्रावण धोंडगे)

नियमित फौजदारी खटला
क्र. ६६/२०१९

**सरकारतर्फे सहा. पोलिस निरीक्षक**
आर्णी पोलिस ठाणे
ता. आर्णी, जि. यवतमाळ. } ... अभियोग पक्ष.

**विरुध्द**

**१. पुष्पाबाई सुभाष गावंडे**, वय– ५४ वर्षे,
**२. सुभाष तुकाराम गावंडे**, वय– ६६ वर्षे,
**३. सोनू प्रविण जाधव**, वय– ३५ वर्षे,
**४. नम्रता भास्कर जवके**, वय– ३३ वर्षे,
रा. महाळुंगी, ता. आर्णी, जि. यवतमाळ. } ........... आरोपी

**दोषारोप :** भा. दं. वि. कलम ३४१,३२४,५०४, ५०६ सह ३४ अन्वये प्रमाणे.

हजेरी–

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्षातर्फे शासकीय अभियोक्ता | : | श्री. आर.पि.गावंडे |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | : | श्री. आय.ए.चव्हाण |

# न्यायनिर्णय

(दिनांक २० मे, २०२६ रोजी घोषीत)

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०९/०४/२०१९ |
| फिर्याद दाखल केल्याची तारीख | १०/०४/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | २९/०५/२०१९ |
| दोषारोप निश्चीत केल्याची तारीख | १२/०६/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १२/१२/२०२३ |
| न्यायनिर्णय करीता प्रकरण ठेवल्याची तारीख | २०/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय जाहीर केल्याची तारीख | २०/०५/२०२६ |
| दोषी व्यक्तीस जेलमध्ये पाठविल्याची तारीख, लागु असल्यास | – |

आरोपीची माहिती

<table>
<tr><th>क्र.</th><th>नाव</th><th>अटकेची तारीख</th><th>जामिनावर सोडल्याची तारीख</th><th>गुन्ह्याची कलमे</th><th>आरोपीस निर्दोष मुक्त केले की सिध्ददोष</th><th>दिलेली शिक्षा</th><th>संपरिक्षे दरम्यान जेलमध्ये पाठविल्याचा कालावधी</th></tr>
<tr><td>१</td><td>पुष्पाबाई सुभाष गावंडे</td><td rowspan="4">२०/०४/२०१९</td><td rowspan="4">२०/०४/२०१९</td><td rowspan="4">भा.दं.वि. कलम ३४१,३२४, ५०४, ५०६ सह ३४</td><td rowspan="4">निर्दोष मुक्त</td><td rowspan="4">–</td><td rowspan="4">–</td></tr>
<tr><td>२</td><td>सुभाष तुकाराम गावंडे</td></tr>
<tr><td>३</td><td>सोनू प्रविण जाधव</td></tr>
<tr><td>४</td><td>नम्रता भास्कर जवके</td></tr>
</table>

प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३४१,

३२४,५०४,५०६ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराधाकरिता संपरिक्षा घेण्यात आली.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः–

दि. ०९/०४/२०१९ रोजी सकाळी ९.०० वाजताचे सुमारास मौजा महाळुंगी येथील शेत शिवारात आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांना इच्छापुर्वक दुखापत पोचविली, त्यांचा रस्ता अडवला तसेच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली, वगैरे मजकूराच्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द गु.र.नं.२२०/२०१९ भारतीय दंड संहिता कलम ३४१,३२४,५०४,५०६ सह ३४ अन्वये नोंदविण्यात आला. तपास अधिकारी यांनी घटनेचा पुढील तपास केला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा व जप्ती पंचनामा केला. तपासाअंती आरोपींविरूध्द पुरेसा पुरावा गोळा झाल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

३. आरोपीविरूध्द भारतीय दंड संहिता कलम ३४१,३२४,५०४,५०६ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र असणारा दोषारोप (नि.क्र.२१) निश्चित करण्यात आला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटल्याला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली. आरोपींविरूध्द अभिलेखावर पुरावा आल्याने त्यांचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत निवेदन निशाणी क्र.४६ ते ४९ कडे नोंदविण्यात आले. त्यात त्यांनी संपूर्ण बचावाचा पवित्रा घेतला.

४. सहाय्यक शासकीय अभियोक्ता व आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला व पुराव्याअंती न्यायनिर्णयाकरिता खालील वादप्रश्न उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देण्यात येतात.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, दि. ०९/०४/२०१९ रोजी सकाळी ९.०० वाजताचे सुमारास मौजा महाळुंगी येथील शेत शिवारात आरोपींनी फिर्यादीला व साक्षीदारांना ज्या दिशेने जाण्याचा त्यांना हक्क आहे त्या दिशेने जाण्यास मज्ञाव केला, व त्याद्वारे भारतीय दंड विधान ३४१ सह ३४ प्रमाणे शिक्षेसपात्र अपराध केला ? | ... नाही. |
| २ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांना इच्छापुर्वक दुखापत पोचविली व त्याद्वारे भारतीय दंड विधान ३२४ सह ३४ प्रमाणे शिक्षेसपात्र अपराध केला ? | ... नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ केली, त्यामुळे त्यांना राग येऊन त्यांनी इतर लोकांचा स्वस्थपणा मोडावा किंवा दुसरा एखादा अपराध करावा यासाठी त्यांना प्रवृत्त केले व त्यायोगे भा. दं. वि. कलम ५०४ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला ? | ... नाही. |
| ४ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, उपरोक्त तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीला उद्देशपूर्वक फौजदारीपात्र धाकदपटशा करुन मनात भिती निर्माण होईल अशाप्रकारे जीवाने मारण्याची धमकी दिली व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ५०६ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला? | ... नाही. |
| ५ | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

**५.** आरोपींविरूध्दचा दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने ४ साक्षीदार तपासले, तसेच काही कागदोपत्री पुरावे दाखल केले. त्यांचा संदर्भ यापुढे वेळोवेळी घेण्यात येत आहे. न्यायालयामार्फत स्वतःहुन इतर साक्षीदारांना समन्स पाठविण्यात आले. परंतू इतर साक्षीदार गैरहजर राहील्याने तसेच जलदगतीने न्याय मिळणे हा आरोपीचा संविधानीक अधिकार असल्याने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

**भाग क**

साक्षीदारांची यादी.

| अभियोगपक्षाचे साक्षीदार | | |
|---|---|---|
| क्र. | नाव | साक्षीदाराचा प्रकार |
| **अ.सा.क्र.१** | अश्वीनी शरद गावंडे | फिर्यादी |
| **अ.सा.क्र.२** | पुष्पा प्रकाश गावंडे | साक्षीदार |
| **अ.सा.क्र.३** | स्वप्नील प्रकाश गावंडे | साक्षीदार |
| **अ.सा.क्र.४** | शरद प्रकाश गावंडे | साक्षीदार |
| बचाव पक्षाचे साक्षीदार | | |
| - | | |

| न्यायालयाचे साक्षीदार |
|---|
| - |

निशाणी क्रमांक दिलेले कागदपत्रांची यादी.

| अभियोगपक्षाची कागदपत्रे | | |
|---|---|---|
| क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
| १. | निशाणी ३७/अ.सा.क्र.१ | फिर्याद |
| २. | निशाणी ३८/अ.सा.क्र. १ | छापील प्रथम खबरी अहवाल |
| बचाव पक्षाची कागदपत्रे | | |
| - | | |
| न्यायालयाची कागदपत्रे | | |
| - | | |
| आर्टीकल | | |
| – | – | – |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>वादप्रश्न क्रमांक १ ते ४ करीता</u>:–**

**६.** अभियोग पक्षातर्फे फिर्यादी म्हणून अश्वीनी शरद गावंडे (अ.सा.क्र.१) यांना नि.क्र.३६ कडे तपासण्यात आले. त्यांनी शपथेवर कथन केले की, "मी आरोपींना ओळखते. घटना दिनांक ०९/०४/२०१९ रोजी सकाळी ९.०० ते ९.३० चे दरम्यान शेतात जातांना पांदण रस्त्यावर घडली होती.सदर दिवशी मी, माझी सासू व जाऊ आम्ही शेतामध्ये जात होतो. रस्त्यावरुन जात असतांना आरोपी लोकं समोर आले व शेतात जावु नका, तुम्ही आमचा ऊस पेटवला असे म्हणुन भांडण करु लागलेसर्व आरोपींनी घाण घाण शिव्या दिल्या. त्यानंतर त्यांनी मारायला पण सुरुवात केली. आरोपी नम्रताने माझ्या डोक्यात दगड मारला. सर्व आरोपींना मला व माझ्या जाऊ व सासुला लाथाबुक्कयाने मारहाण केली होती.त्यानंतर आम्ही घरी आलो. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला गेलो. मी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला. लेखी रिपोर्ट निशाणी ३७ वर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. छापील एफ.आय.आर. निशाणी ३८ वर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहेपोलीसांनी विचारपूस करुन माझे बयाण नोंदवले होते."

**७.** त्यांनी त्यांच्या उलटतपासात कथन केले की, "माझे लहान सासरे यांचे आरोपींसोबत पूर्वीपासून शेतीबाबत वाद आहेत. त्याबद्दल आरोपीविरुध्द दारव्हा येथे प्रकरण दाखल केले होते.

आमच्या घरांचे लोकांचे पूर्वीपासुन शेतीबद्दल वाद आहे. मी पोलीसांना बयाण देतेवेळी "सर्व आरोपी शिवीगाळ करत होते" असे सांगितले होते, परंतु सदर बाब माझे पोलीस बयाणात का नमुद नाही याचे कारण असे की, मी पोलीसांना "घाण घाण भाषेत शिवीगाळ केली" असे सांगितले होते. आरोपी क्र.४ हीने आमचेविरुध्द दिनांक ०९/०४/२०१९ रोजी आमचेविरुध्द रिपोर्ट दिला होता. त्या प्रकरणमध्ये माझे पती दीर व सासू आरोपी आहेत. सदर प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहेत."

८. अभियोग पक्षातर्फे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून पुष्पा प्रकाश गावंडे (अ.सा.क्र.३) यांना नि.क्र.३९ कडे तपासण्यात आले. त्यांनी शपथेवर कथन केले की, "मी आरोपींना ओळखते. फिर्यादी माझी सून आहे. घटना अंदाजे तीन चार वर्षापुर्वी सकाळी ९.०० ते ९.३० चे दरम्यान शेतात जातांना पांदण रस्त्यावर घडली होती.सदर दिवशी मी, माझ्या सुनांसोबत शेतामध्ये जात होते. शेतात जात असतांना आरोपी आले. त्यांनी आम्हाला आमचा ऊस जाळला असे म्हटले. त्यांनी आम्हाला अडवुन शेतात जावु दिले नाही.त्यांनी आमचेसोबत भांडण केले. त्यांनी आम्हा तिघींना लाथाबुक्क्यांनी मारले. आरोपी नम्रताने माझे सूनेला डोक्यात गोटा मारला. त्यामुळे तिचे डोके फुटले. त्यानंतर माझे सूनेने पोलीस स्टेशनला जावुन रिपोर्ट दिला होता.पोलीसांनी विचारपूस करुन माझे बयाण नोंदवले होते."

९. त्यांनी त्यांच्या उलटतपासात कथन केले की, "सुधाकर गावंडे सोबत पूर्वीपासून शेतीचे वाद आहेत. माझे दिर सुधाकर गावंडे यांनी आरोपींविरूद्ध दारव्हा न्यायालयात प्रकरण दाखल केलेले होते."

१०. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार म्हणून स्वप्नील प्रकाश गावंडे (अ.सा.क्र.३) यांना नि.क्र.४३ कडे तर शरद प्रकाश गावंडे (अ.सा.क्र.४) यांना नि.क्र.४४ कडे तपासण्यात आले. त्यांनी शपथेवर मान्य केले की, घटनेच्या वेळी ते घटनास्थळावर हजर नव्हते, त्यामुळे त्यांची साक्ष ऐकिव माहितीवर आधारित असल्याने त्यांचेवर निःसंशय विश्वास ठेवणे योग्य व न्यायोचित होणार नाही.

११. अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर.पी.गावंडे यांनी युक्तीवाद केला की, अभियोग पक्षातर्फे एकूण ४ साक्षीदार तपासण्यात आले. प्रस्तुत गुन्हयातील घटनास्थळ व जप्ती पंच तसेच तपास अधिकारी यांना तपासण्यात आले नसले तरी इतर साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यात घटनेबाबत कथन केलेले आहे. फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्या साक्षीतुन आरोपींविरूध्दचा दोषारोप सिध्द झाला आहे. त्यामुळे आरोपींना दोषी धरून त्यास जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी.

१२. आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. इरफान चव्हाण यांनी युक्तीवाद केला की, फिर्यादी व साक्षीदारामार्फत आरोपींची ओळखपरेड झाली नाही. त्यामुळे त्यांनी दिलेल्या साक्षीवर विश्वास ठेवता येणार नाही. प्रस्तुत गुन्हयातील घटनास्थळ व जप्ती पंच तसेच तपास अधिकारी यांना तपासण्यात

आले नाही. त्यामुळे आरोपींवरील दोषारोप संशयापलीकडे जावून सिध्द झालेला नाही. म्हणून आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात यावे.

**१३.** अभियोग पक्षाने प्रस्तुत गुन्ह्यात फिर्यादी अश्वीनी शरद गावंडे व तिची सासू पुष्पा प्रकाश गावंडे यांच्या साक्षींवर मुख्यत्वे अवलंबून राहिलेले दिसते. दोन्ही साक्षीदारांनी आरोपींनी त्यांना शेतात जाण्यापासून अडवून शिवीगाळ व मारहाण केल्याचे कथन केले आहे. तथापि, त्यांच्या साक्षींचे बारकाईने परीक्षण करता असे दिसून येते की, फिर्यादी पक्ष व आरोपी पक्ष यांच्यामध्ये पूर्वीपासून शेतीसंबंधी वाद सुरू असल्याचे दोन्ही साक्षीदारांनी उलटतपासात स्पष्टपणे मान्य केले आहे. आरोपी क्र.४ हिनेही त्याच दिवशी फिर्यादी पक्षाविरुद्ध स्वतंत्र रिपोर्ट दिलेला असून ते प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याचे फिर्यादीने कबूल केले आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये जुने वैमनस्य अस्तित्वात असल्याचे स्पष्ट होत असून, अशा परिस्थितीत फिर्यादी व तिच्या नातेवाईक साक्षीदारांच्या साक्षीकडे सावधगिरीने पाहणे आवश्यक ठरते.

**१४.** फिर्यादीने मुख्य तपासात सर्व आरोपींनी घाण घाण शिवीगाळ केल्याचे म्हटले असले तरी तिच्या पोलीस बयाणात त्या बाबीचा स्पष्ट उल्लेख नाही. याबाबत तिने दिलेले स्पष्टीकरण समाधानकारक वाटत नाही. तसेच आरोपी नम्रताने दगड मारल्यामुळे डोके फुटल्याचे कथन करण्यात आले असले तरी त्यासंदर्भात कोणताही वैद्यकीय पुरावा, दुखापत प्रमाणपत्र किंवा डॉक्टरांची साक्ष अभियोग पक्षाने सादर केलेली नाही. त्यामुळे कथित दुखापतीबाबत स्वतंत्र व निष्पक्ष पुरावा उपलब्ध होत नाही.

**१५.** अभियोग पक्षाने घटनास्थळ पंच, जप्ती पंच तसेच तपास अधिकारी यांना न्यायालयात तपासलेले नाही. परिणामी कथित घटनास्थळाची परिस्थिती, दगड किंवा इतर वस्तूंची जप्ती, यांची शहानिशा न्यायालयासमोर होऊ शकलेली नाही. तपास अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीत साक्षीदारांच्या बयाणातील त्रुटी विधिवत सिद्ध करणे शक्य होत नाही. ही अभियोग पक्षाच्या प्रकरणातील गंभीर त्रुटी मानावी लागेल.

**१६.** अभियोग पक्षाचे इतर साक्षीदार स्वप्नील प्रकाश गावंडे व शरद प्रकाश गावंडे यांनी स्वतःच कबूल केले आहे की, ते घटनेच्या वेळी घटनास्थळी उपस्थित नव्हते. त्यामुळे त्यांची साक्ष ही ऐकिव स्वरूपाची असून तिच्यावर निःसंशय विश्वास ठेवणे सुरक्षित ठरत नाही. तसेच, फिर्यादी व साक्षीदारांनी आरोपींना पूर्वीपासून ओळखत असल्याचे स्पष्टपणे सांगितले असल्यामुळे स्वतंत्र ओळख परेड न घेण्यात आली ही बाब स्वतःमध्ये अभियोग पक्षासाठी घातक ठरत नसली, तरीही इतर स्वतंत्र व निष्पक्ष पुराव्याच्या अभावामुळे केवळ हितसंबंधित साक्षीदारांच्या साक्षीवर दोषारोप निश्चित करणे सुरक्षित ठरत नाही.

**१७.** फौजदारी न्यायशास्त्रानुसार आरोपींविरुद्धचा गुन्हा संशयापलीकडे जाऊन सिद्ध होणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात पूर्ववैमनस्य, स्वतंत्र साक्षीदारांचा अभाव, वैद्यकीय पुरावा सादर न होणे, तपास अधिकारी व पंच साक्षीदार तपासण्यात न येणे तसेच साक्षींतील त्रुटीमुळे अभियोग पक्ष आरोपींविरुद्धचा दोषारोप निःसंशयपणे सिद्ध करण्यात अपयशी ठरलेला आहे. परिणामी संशयाचा फायदा आरोपींना देणे आवश्यक व न्यायोचित ठरते.

**१८.** त्याचप्रमाणे सदर प्रकरणात फिर्यादी व साक्षीदारामार्फत आरोपींची ओळखपरेड झाली नाही. त्यामुळे त्यांनी दिलेल्या साक्षीवर विश्वास ठेवता येणार नाही. अभियोगपक्षातर्फे पंच, तपास अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांना तपासण्यात आले नाही. तसेच आरोपींनी कोणत्या शब्दात धमकी दिली व शिवीगाळ केली ते शब्द अभिलेखावर आले नाहीत. घटनास्थळ व जप्ती पंचनामा तसेच वैद्यकिय प्रमाणपत्र नियमाप्रमाणे सिध्द झालेले नाही. त्यामुळे आरोपींनी गुन्हा केल्याचे संशयापलिकडे सिध्द होत नाही. आरोपींविरुध्द कोणताही भक्कम व विश्वसनीय पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे वादप्रश्न क्र.१ ते ४ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

<u>**वादप्रश्न क्र.५ करिता**</u>:–

**१९.** आरोपींविरुध्द कोणताही भक्कम व विश्वसनीय पुरावा अभिलेखावर न आल्याने अभियोगपक्ष आरोपींविरूध्दचा दोषारोप सिध्द करू शकला नाही. त्यामुळे आरोपी हे निश्चितपणे निर्दोष सुटका होण्यास पात्र होत आहे. म्हणून वादप्रश्न ५ चे उत्तर नोंदवितांना मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे **–**

## <u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| **१.** | आरोपी क्र. १. पुष्पाबाई सुभाष गावंडे, २. सुभाष तुकाराम गावंडे, ३. सोनू प्रविण जाधव व ४. नम्रता भास्कर जवके, यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३४१, ३२४,५०४,५०६ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| **२.** | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये दिलेला जामीन आज रोजी पासून पुढील ६ महिन्यांच्या कालावधीकरिता अस्तीत्वात राहील. |

| | |
|---|---|
| **३.** | गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल दगड मूल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर त्याचा नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)**

Digitally signed by DHONDAGE VISHAL SHRAVAN
Date: 2026.05.20 17:46:15 +0530

दिनांकः २०/०५/२०२६ (**विशाल श्रावण धोंडगे**)

स्थळः आर्णी न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

| | | |
|---|---|---|
| निकाल सांगितल्याचा दिनांक | : | २०/०५/२०२६ |
| निकाल टंकलिखीत केल्याचा दिनांक | : | २०/०५/२०२६ |
| निकालावर सही केल्याचा दिनांक | : | २०/०५/२०२६ |